१२५

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई**

☎/ 🖷:- ०२२ २७५७१३११ Website:www.mahalfa.in E.Mail:ad.report@mahalfa.in

RIGHT TO INFORMATION सूचना का अधिकार

**कार्यालयीन आदेश क्र. ९१ व दिनांक 2 7 JUL 2015**

विषयः- ग्रामपंचायत लेखापरीक्षण कार्यपध्दती

मुंबई ग्रामपंचायत (हिशेब तपासणी) नियम १९६१ मधील नियम १५ नुसार ग्रामपंचायतींचे संपुर्ण वित्तीय वर्षासाठीचे हिशोबांचे लेखापरीक्षण करण्याबाबत तरतुद आहे.

ग्रामपंचायतीचे लेखापरीक्षण मोठया प्रमाणावर थकित असल्याने ग्रामविकास विभागाने सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीचे प्रलंबित ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण माहे ऑगस्ट २०१५ पर्यंत पुर्ण करण्याचा इष्टांक दिलेला आहे.

यास्तव सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीतील प्रलंबित ग्रामपंचायत घटकांचा निपटारा करण्यासाठी त्यांच्या लेखापरीक्षणासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१. ग्रामपंचायतीची जमा बाजु संपुर्ण वर्षाची तपासण्यात यावी.
२. ग्रामपंचायतीची खर्च बाजु प्रत्येक वर्षासाठी निवडक ३ महिन्यांची तपासणी करण्यात यावी. सदर तीन महिन्यांमध्ये मार्च महिना अनिवार्य असुन ज्या महिन्यात सर्वात जास्त खर्च झालेला असेल, त्या दोन महिन्यांचे व्यवहार तपासण्यात यावे व उर्वरित नऊ महिन्यांच्या खर्चाचा आढावा घेण्यात यावा.
३. ग्रामपंचायतींच्या अहवालांचे पुर्नविलोकन संचालनालयाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार करण्यात यावे.
४. वरीलप्रमाणे कार्यवाही करत असताना लेखापरीक्षणाचा गुणात्मक दर्जा उत्तम राहिल याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

--२--

५. वरील आदेश सन २००७-०८ ते २०१३-१४ या कालावधीतील प्रलंबित ग्रामपंचायत घटकांच्या लेखापरीक्षणासाठीच लागू राहतील. सन २०१४-१५ व त्यापुढील कालावधींचे ग्रामपंचायतींचे जमा व ख़र्च या दोन्ही बाजुंचे १००% लेखापरीक्षण करणे बंधनकारक राहिल.

वरीलप्रमाणे कार्यवाही तात्काळ अमलात आणण्यात यावी.

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य.

प्रत:-

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, (सर्व जिल्हे)